# दिनांक 31/03/2025

**1** कर्जत पोलीस ठाणे हद्दीत हद्दीत दिनांक 29/03/2025 रोजी 20:30 वा च्या सुमारास मौजे कर्जत चारफाटा ठाकरे हॉटेल जवळ ता.कर्जत येथे आरोपी क्र.01 व 02 रा.शिवाजीनगर गोवंडी नवी मुंबई यांनी त्यांचे ताब्यातील आयसर टेम्पो क्र.एम.एच-03 डीव्ही 8011 यामध्ये आरोपी क्र.03 याचे मालकीचे एकुण 15 म्हशी हया संगणमत करुन त्या अत्यंत दाटीवाटीने टेम्पोमध्ये भरुन त्यांच्या गळयाला रशीने बांधुन त्यांच्या चारया पाण्याची सोय योग्य व्यवस्था न करता क्रुरतेने आपले टेम्पोमध्ये भरुन मुरबाड बाजुकडुन कुर्ला मुंबई बाजुकडे जात असताना कर्जत चारफाटा ठाकरे हॉटेल जवळ ता .कर्जत हददीत मिळुन आला आहे

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं.93/2025, प्राण्याचा छळ प्रतिबंध अधिनियम 1960 चे कलम 11(1) ,(अ),(ड),(ई), (ह) (फ),सह भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 3(5)प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री किरण नवले हे करीत आहेत.

**2**. पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 29/03/2025 रोजी 11:15 वा ते दि. 30/03/2025 रोजी 11:15 वा च्या दरम्यान मौजे न्यु व्हीलन कॉलेज महाडीक वाडी येथुन ता.पेण येथुन फिर्यादी यांची मुलगी वय-17 हीस कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी फिर्यादी रा.रियल इस्टेट रा.विग तारामती टॉवर रुम न.130 ए विव चिचंपाडा पेण यांचे कायदेशीर रखवालीतुन फुस लावुन पळवुन नेले.

याबाबत पेण पोलीस ठाणे गुरनं.58/2025, BNS 2023 चे कलम 137 (2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री घोलप हे करीत आहेत.

**3.** खालापूर पोलीस ठाणे हद्दीद दिनांक 28/03/2025 रोजी 11:30 वा च्या सुमारास मौजे हाळ गावच्या नदीचे ब्रिजवर जुना मुंबई पुणे हायवे रोडवर येथे फिर्यादी रा.महड पो.खालापुर हे त्याचे ताब्यातील हिरो होंन्डा मोटार सायकल क्रमांक एम.एच.06 ए.एम. 01105 यावर साक्षीदार यास मागे बसवुन जुना हायवे रोडने महड येथे चालवित घेवुन जात असताना हाळ गावच्या नदीचे ब्रिजवर जुना मुंबई पुणे हायवे रोडवर आलेवेळी पाठीमागुन येणारी महेंद्र बोलेरो पिकअप जीप वरील आरोपी चालक याने त्याच्या ताब्यातील पिकअप जीप रस्त्याच्या परीस्थितीकडे दुर्लक्ष करुन अतिवेगात चालवुन फिर्यादी यांचे मोटारसायकला पाठीमागुन ठोकर मारुन फिर्यादी व साक्षीदार यांच्या लहान मोठया दुखापतीस कारणीभुत होवुन अपघाताची खबर न देता पळुन गेला.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं.112/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे

कलम 184,134, भा.न्या.सं.2023 चे कलम 281,125(अ)125(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/निलेश कांबळे हे करीत आहेत.

**4.** महाड एम.आय.डी.सी पोलीस ठाणे पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 11/03/2025 रोजी 12:30 वा च्या सुमारास मौजे चांढवे खुर्द गावचे हददीत मुंबई गोवा हायवेवर गोवा लेनवर चांढवे खुर्द बायपास रोडजवळ, ता.महाड येथे फिर्यादी रा.कापडे खुर्द, पो-आड, ता.पोलादपुर हे त्यांचे ताबेतील हिरो कंपनीचे पॅशन प्रो मोटार सायकल क्र.एम.एच.06/बी.ए./0553 चालवित घेवुन जात असताना आलेवेळी फिर्यादी यांचे पाठीमागुन येणा-या हिरो कंपनीचे स्प्लेंडर मोटारसायकल क्र.एम.एच./09/एफ.एफ/2106 वरिल आरोपीत चालक रा.जावली, ता. शाहूवाडी, जि.कोल्हापुर याने रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन अति वेगाने हयगयीने बेदारकारपणे व दोन वाहनांमध्ये सुरक्षित अंतर न ठेवता मोटारसायकल चालवुन फिर्यादी यांचे मोटारसायकलला पाठीमागुन ठोकर मारुन अपघात करुन अपघातात फिर्यादी व स्वतःचे किरकोळ तसेच गंभीर दुखापतीस कारणीभुत झाला.

याबाबत महाड एम.आय.डी.सी पोलीस ठाणे गुरनं.34/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988चे कलम 184, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 281,125(A),125 (B),¨ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/पवार हे करीत आहेत.

**5**. रसायनी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 29/03/2025 रोजी 11:00 वा ते दि. 30/03/2025 रोजी 11:00 वा च्या दरम्यान मौजे- सोनारवाडी सारसइ, पनवेल येथे महिला फिर्यादी रा. सोनारवाडी सारसई, ता.पनवेल यांनी आरोपीत क्र.01 यांचे पत्नीस तुझ्या नव-याला देखील कधी कधी पाणी सोडायला सांगत जा असे सांगितले या कारणावरुन आरेपीत क्र-1 यांने फिर्यादी यांचे नाव अश्लील शिविगाळी करून फिर्यादी यांचे मनास लज्जा निर्माण केली तसेच आरोपीत क्र.01,2 हे फिर्यादीला वारंवार शिविगाळी करीत असल्याने फिर्यादी व साक्षीदार यांचे सह जावून जाब विचारला या कारणावरुन आरोपीत क्र.01 ते 05 सर्व रा. सोनारवाडी सारसई .ता. पनवेल यांनी एकत्रित गर्दी करून शिवीगाळी करून साक्षीदार हीस हाताबूक्यांनी मारहाण करुन गळयातील मंगळसूत्र तोडून नुकसान केले व भांडणे सोडवण्यासाठी आलेले 02 साक्षीदार यांना देखील शिवीगाळी हाताबुक्यांनी मारहान करून जिवे मारण्याची धमकी दिली.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे गुरनं.73/2025, बी.एन.एस कलम 189¼1½, 189¼ 2½,190,,115(2),324¼4½,352, 351(2),79, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/श्री.प्रमोद जाधव हे करीत आहेत.

**6.** रसायनी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 30/03/2025 रोजी 07:00 वा च्या सुमारास मौजे सोनारवाडी सारसई, पनवेल येथे आरोपीत क्रं.01 ते 07 यांनी माहिला फिर्यादीने गावातील नळावर पाणी भरू नये या कारणावरून कूरापत काढून भांडण करून प्रथम फिर्यादीची सून यांना हाताबुक्यांनी मारहान केली व फिर्यादीच्या राहते घरात गैरकायदयाची मंडळी जमवून प्रवेश करुन फिर्यादीचा पती, मुलगा, ननंद, सुन, अशांना शिविगाळी करून बेदम

हाताबुक्कयांनी मारहान करून जिवे मारण्याची धमकी दिली व घराचे खिडक्यांच्या काचा फोडून फिर्यादीच्या सुनेचे गळयातील पोत तोडून नुकसान केले.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे गुरनं.74/2025, बी.एन.एस कलम 189(1),189(2) ,190,115(2),324(4),333, 352, 351(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/श्री.प्रमोद जाधव हे करीत आहेत.

**7.** महाड (एम.आय.डी.सी.) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 30/03/2025 रोजी 11:30 वा च्या सुमारास मौज समर्थ नगर, ढालकाठी, ता. महाड येथे फिर्यादी यांचा मुलगा हा अल्पवयीन आहे हे माहित असून देखील कोणीतरी अज्ञात ईसमाने फिर्यादी यांचे रखवालीतून संमतीशिवाय फूस लावून पळवून नेले.

याबाबत महाड (एम.आय.डी.सी.) पोलीस ठाणे गुरनं. 35/2025, भारतीय न्याय संहिता 137(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री संजय मुंढे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 30.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 160 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 1,62,500/-रुपये इतका दंड आकारला आहे.